Review Of Research
Vol. 3 | Issue.4 | Jan.2014
ISSN:-2249-894X Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# ग्रामीण साहित्य चळवळीची स्थितीगती

**प्रा. डॉ. भास्कर निफाडे**
**पदव्युत्तर अध्ययन व संशोधन केंद्र, रा.ब.नारायणराव बोरावके महाविद्यालय,**
**श्रीरामपूर, जि.अहमदनगर.**

## प्रस्तावनाः

साधारणतः १९७० च्या आसपास महाराष्ट्रातील वातावरण आणि वाङ्मयीन क्षेत्रातील पर्यावरणात क्रमाक्रमाने बदल होऊ लागला. आतापर्यंत दलित साहित्याचा प्रवाह नावारुपाला आलेला होता. दलित साहित्याचे वेगळेपणही लक्षात येऊ लागले होते. अशा परिस्थितीत आणखी दोन चळवळींना प्रारंभ झालेला दिसतो. ग्रामीण साहित्य आणि स्त्रीवादी साहित्य या त्या दोन चळवळी होत.

म. फुले यांच्या काळापासून ग्रामीण साहित्य लिहिले जात होते. त्या काळात या वेगळया साहित्याची दखल घेतली गेली नसली तरी १९२० नंतरच्या ग्रामीण साहित्याची मात्र बऱ्यापैकी दखल घेतली गेली होती. नावीन्याचा भाग म्हणून असेल, अगर चांगले लेखन म्हणून असेल, त्या त्या साहित्याची प्रासंगिक म्हणून का होईना-दखल घेतली गेली होती. किंबहुना, असे म्हणता येईल की निदान या साहित्याच्या विरोधात तरी कुणी बोलत नव्हते. परंतु १९७० नंतर ग्रामीण साहित्याच्या चळवळीची भाषा सुरु झाली आणि एकूण मराठी साहित्यिक ग्रामीण चळवळीच्या, ग्रामीण साहित्याच्या बाबतीत प्रतिकूल अभिप्राय नोंदवू लागले. प्रकट-अप्रकटपणे या साहित्य चळवळीच्या विरोधी सूर लावू लागले. असे कां झाले असावे याचीही काही मीमांसा करता येऊ शकते. एक तर १९७० पूर्वीचे ग्रामीण साहित्य आणि इतर साहित्य यांच्या प्रेरणा आणि स्वरुप यांमध्ये फारसे अंतर नव्हतेच. म्हणजे फडके, माडखोलकर यांच्या प्रेरणा रंजनाच्या होत्या; तर ठोकळ, दिघे यांच्याही साहित्याचे स्वरुप रंजनपर होते. पुढे नवकथेच्या काळात प्रयोगशीलता, मनोविश्लेषण इत्यादि बाबी नागर कथेत जशा महत्त्वाच्या होत्या, त्याप्रमाणेच ग्रामीण साहित्यातही त्या महत्त्वाच्या ठरल्या. याचा अर्थ एवढाच की, प्रस्थापित लेखनाचे संकेत आणि प्रस्थापित अभिरुची यांचे आणि ग्रामीण साहित्यप्रवाहाचे संबंध परस्परपूरक होते. त्यामुळे या काळातील साहित्यासंबंधी प्रतिकूल भूमिका घेण्याचे काही कारण नव्हते आणि अशी प्रतिकूल भूमिका घेतलीही गेली नाही. परंतु ग्रामीण साहित्याची चळवळ सुरु झाल्याबरोबर अशी प्रतिकूल भूमिका घेतली जाऊ लागली. त्याचे कारण उघडच होते आणि ते म्हणजे प्रस्थापित अभिरुचीशी काही एक संघर्षाची भूमिका ही चळवळ घेऊ पहात होती. विशेषतः स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ग्रामीण भागातून जन्मलेली पिढी आता लिहु-वाचू लागली होती आणि तिला आपला गाव, गावातील माणसे आणि त्यांचे वास्तव भोवतीच्या ग्रामीण साहित्यात कुठेही नाही असे वाटत होते. ज्या ग्रामीण जीवनाचा म. गांधी यांच्या काळात गौरव केला गेला होता, ते ग्रामीण जीवन तर भोवती कुठेच नव्हते. ग्रामीण जीवनाचे, कृषिकेंद्रिततेचे स्वरुप संपूर्णतः बदलून गेलेले होते आणि लेखकाला वाटत होते की जे वास्तव आपण अनुभवले त्या वास्तवाचे स्वरुप उलगडून पहावे. त्या वास्तवामागे असणाऱ्या वास्तवाचा शोध घ्यावा. ही प्रक्रिया कधी घडली तेही समजून घेता येऊ शकेल.

वाङ्मयाच्या प्रांतात चळवळी कां आणि कशा निर्माण होतात, याबद्दल स्वतंत्र विवेचन करता येईल, परंतु एक मात्र निश्चित की, जीवनामध्ये जेव्हा जेव्हा काही परिवर्तने होतात अगर जीवनामध्ये काही असंतोष निर्माण होतात, तेव्हा

तेव्हा वाङ्मयीन जगतामध्ये चळवळींची भाषा सुरु होते. मध्ययुगीन सांप्रदायिक चळवळींपासून आजतागायत झालेल्या चळवळींचा इतिहास जर पाहिला तर असे लक्षात येते की, ज्या वाङ्मयीन चळवळींची पाळेमुळे समाजात असतात त्याच चळवळी अर्थपूर्ण होतात, टिकतात आणि वाढतात. जसे वारकरी चळवळ आजतागायत टिकून आहे. परंतु दत्तसंप्रदाय अगर लघुअनियकालिांची चळवळ या चळवळी कधीच कोलमडून पडल्या, कारण मर्यादित हेतूने केलेल्या चळवळी टिकत नाहीत. याचा अर्थ असा की ग्रामीण साहित्याची चळवळीची भाषा सुरु झालेली असेल तर त्याची कारणे तत्कालीन सामाजिक जीवनात असणार हे उघड आहे. ही कोणती कारणे होती?

साधारणतः १९७१ ते ७४ पर्यंत संपूर्ण महाराष्ट्र दुष्काळात होरपळून निघलेला होता आणि त्यामुळे नव्याने शिकलेली ग्रामीण भागातील नवी पिढी अधिकच अंतर्मुख झाली होती. ज्या कृषिव्यवस्थेचा गौरव केला जातो तिचे तर धिंडवडे निघालेलेच होते; हे एक तात्कालिक असे कारण असले तरी या निमित्ताने लेखक जागरुक झाला होता. महाराष्ट्रात सर्वत्र दुष्काळ आणि शहरांच्या समृध्दीमध्ये मात्र कणभरही उणीव नाही. हे एक नवेच वास्तव त्याला जाणवायला लागले होते. याशिवायही ग्रामीण भागात विविध प्रश्न निर्माण होऊ लागले होते. जमिनीचे छोटे-छोटे तुकडे, सुशिक्षित बेकारी, नवी बी-बियाणे, नवी-खते असे असंख्य नवे प्रश्न उपस्थित होत होते. निवडणुका तर प्रत्यही होतच होत्या. अशा सगळया प्रश्नांनी भोवंडून गेलेला शेतकरी हा या नव्या लेखकाच्या चिंतनाचा विषय बनला. वाढत्या औद्योगीकरणामुळे खेडी ओस पडण्याची जी प्रक्रिया आधीच सुरु झाली होती, तिने आता वेग घेतला. ही बाबही नव्या लेखकाच्या दृष्टीने चिंतेची आणि चिंतनाची होती. ग्रामीण भागात असंतोषाला प्रारंभ झाला होता आणि त्याची धग चळवळ करु इच्छिणाऱ्या नव्या लेखकांना जाणवत होती.

खरे म्हणजे हे जे नवे जाणवले आहे, त्याला फारच उशीर झालेला आहे. कारण म. फुले यांनी जेव्हा 'शेतकऱ्याचा आसूड' लिहिला तेव्हापासूनच महाराष्ट्राच्या आणि भारताच्याही ग्रामीण भागात असंतोषाचा प्रारंभ झालेला होता. ग्रामीण भागात अनेक प्रश्न निर्माण होत होते. त्यांचे काही उद्रेकही झालेले होते. महाराष्ट्रामध्ये १९ व्या शतकामध्ये ठिकठिकाणच्या शेतकऱ्यांनी उठाव केले होते. 'डेक्कन रॉयटर्स्' या नावाने ते ओळखले जातात. प्रामुख्याने सावकारशाहीविरुद्धचे हे उठाव होते. 'शेतकऱ्याचा आसूड' निर्माण होण्याचे हेही एक कारण होते. परंतु केवळ महाराष्ट्रातच असे उठाव होत होते असे नाही, तर संपूर्ण भारतभर असे उठाव झालेले दिसतात. उदा. १८७० मध्ये बंगालमध्ये शेतमजुरांचा, कुळांचा उठाव झाला. १८७५ मध्ये महाराष्ट्रात शेतकऱ्यांचा उठाव झाला. १९१७-१८ मध्ये म.गांधी यांच्या नेतृत्वाखाली झालेला चंपारण्याचा लढा तर सर्व परिचितच आहे. १९२२ मध्ये मोपल्याचे बंड झाले. १९२३ पासून १९२८ पर्यंत आंध्रप्रदेश, गुजरात (बार्डोली) मध्ये शेतकऱ्यांची आंदोलने झाली. पुढे १९२९ मध्ये मध्यप्रदेश, गुजरात, कर्नाटक इ. प्रांतात आंदोलने झाली. म. गांधी यांच्या असहकाराच्या माध्यमातूनही शेतकऱ्यांनी उठाव केलेला आहे असे जाणवते. याचा अर्थ असा की, १८७० पासून ते स्वातंत्र्य मिळेपर्यंत ग्रामीण भागातील शेतकरी सतत लढे देतो आहे. आपला असंतोष प्रकट करतो आहे. स्वातंत्र्यानंतरही त्याचे लढे चालूच आहेत असे दिसेल. १९४७ ते १९४९ या काळात जमीनदार आणि कुळे यांच्यातील संघर्ष उत्तर प्रदेशात पेटल्याचे दिसते. १९४६-४७ मध्ये झालेला महाराष्ट्रातील वारल्यांचा लढाही महत्त्वाचाच आहे. १९४६ ते १९५० या कालावधीत बंगालमध्ये 'तिभाग' चळवळ झालेली होती ती कुळांचीच. याच कालखंडात 'तेलंगाना' आंदोलन झाले ते सर्वपरिचित असेच आहे. ते साधारणतः १९५१ पर्यंत कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली चालले. याच कालावधीत त्रिपुरा, मणिपूर या भागांतही शेतकरी आंदोलन पेटले होते. महाराष्ट्रात स्वातंत्र्योत्तर काळात शेतकऱ्यांचे लढे झालेआणि त्यातून वैरागचा गोळीबार झाला हे सर्वश्रुत आहे. याचा अर्थ असा की, साधारणतः गेल्या दीडशे वर्षांपासून ग्रामीण भाग वेगवेगळया कारणांनी धगधगतो आहे. गेल्या दोन-तीन वर्षांत भारतातून १२ ते १४ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत ही सुध्दा वस्तुस्थिती आहे. तरीही या ग्रामीण असंतोषाची नोंद साहित्यात कुठे आलेली आहे, असे दिसत नाही. ही गोष्ट ग्रामीण साहित्याच्या चळवळीमागे आहे हे विसरता येणार नाही.

दुष्काळ हे जसे या चळवळीला तात्कालिक कारण झाले असे म्हटले आहे, त्याचप्रमाणेच आणखी एक कारण घडलेले आहे आणि ते म्हणजे शरद जोशी यांच्या शेतकरी संघटनेचे आंदोलन. साधारणतः १९७२-७३ नंतर शेतीमालाला योग्य भाव मिळाला पाहिजे, यासाठी शेतकरी संघटना लढे देऊ लागली. त्याबरोबरच 'भारत' आणि 'इंडिया' यामध्ये आपला देश विभागला गेला आहे, असे त्यांनी सांगावयास प्रारंभ केला. अंतिमतः शरद जोशी उजव्या दिशेला झुकले, याबाबतीत त्यांच्याशी मतभेद असले तरी त्यांनी उभ्या केलेल्या लढयामुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात एक नवीच जागृती झाली. या लढयामुळे ग्रामीण साहित्याच्या चळवळीला काही आधार प्राप्त झाला, यात शंका नाही.

याचा अर्थ असा की, ग्रामीण साहित्याची चळवळ निर्माण होण्याची बीजे ग्रामीण भागातच होती आणि त्यामुळेच ग्रामीण साहित्याच्या चळवळीची भाषा सुरु झाली असे दिसते.

१९७०-७५ नंतर ग्रामीण साहित्याची चळवळ करु इच्छिणाऱ्या लेखकांनी आपल्याभोवतीच्या भीषण वास्तवाचा अन्वयार्थ लावण्यासाठी (साहित्य चळवळींमध्ये अन्वयार्थाला अधिक महत्त्व असते) आपले नाते जोडले ते थेट म. फुले यांच्याशी,-त्यांच्या वाङ्मयाशी. किंबहुना जवळजवळ शंभर वर्षांनी म. फुले यांचा संदर्भ स्वीकारला गेला ही बाब लक्षणीय आहे. कुठल्याही वाङ्मयीन चळवळीला अन्वेषण दृष्टी प्राप्त होण्यासाठी काहीएका तत्त्वविचाराची आवश्यकता असते. हा तत्त्वविचार शोधण्यासाठी त्यांना म. फुले हे जवळचे वाटले यात काही नवल नाही.

खरे म्हणजे ग्रामीण जीवनासंबंधी, कृषिव्यवस्थेसंबंधी, ग्रामीण जीवनात निर्माण झालेल्या प्रश्नांसंबंधी आणि एकूण ग्रामीण पर्यावरणसंबंधी वैचारिक स्वरुपाचे विपुल लेखन झालेले आहे. म. फुले यांचा 'शेतकऱ्याचा आसूड' व 'गुलामगिरी' हे ग्रंथ तर महत्त्वाचे आहेतच, पण कृष्णराव भालेकर यांचे लेखनही अतिशय मोलाचे आहे. 'दैव दैव म्हणत शेतकरी कसा रसातळाला जातो' याची फार चांगली मीमांसा भालेकरांनी केली आहे. तसेच ग्रामीण समाजाच्या उत्थापनासाठी काय केले पाहिजे, हेही त्यांनी सांगितले आहे.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी ग्रामीण जीवनासंबंधी केलेली मीमांसा अतिशय मूलगामी आहे. तसेच शेतीमालाच्या किंमतीचा प्रश्न सर्वप्रथम महर्षी शिंदे यांनी मांडला आहे. 'ज्याच्या हाती चंदी त्याचा घोडा' असला पाहिजे, या भाषेत त्यांनी शेतीमालाच्या भावासंबंधी मीमांसा केली आहे. मुकुंदराव पाटील आणि जवळकर यांनीही ग्रामीण भागातील असंतोषाचे मूळ कशात आहे ते सांगितले आहे. पुरोहित, सावकार आणि साहेब हे तिघेही ग्रामीण समाजाचे शत्रू आहेत. हे त्यांनी सप्रमाण दर्शविले आहे. डॉ. आंबेडकरांनी १९३५ साली शेतकऱ्यांनी शेतकरी म्हणून एकत्र आल्याशिवाय आणि जाती सोडल्याशिवाय त्यांचा उध्दार होणे शक्य नाही असे सांगितलेले आहे. याचा अर्थ असा की, म. फुले ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर या परंपरेने जी मीमांसा केलेली आहे, तीच ग्रामीण साहित्याचे तत्त्वज्ञान आहे आणि याच तत्त्वज्ञानाच्या परंपरेशी ग्रामीण साहित्याच्या चळवळीने स्वतःला जोडून घेतलेले आहे. त्यामुळेच १९७५ नंतरच्या ग्रामीण साहित्याचे स्वरुप बदललेले दिसते. ते काहीसे लढावूही झालेले आहे असे दिसते.

याचा अर्थ असा की, 'ग्रामीण' या संज्ञेने ध्वनित होणारा अर्थ आता वेगळाच आहे. साहित्याच्या क्षेत्रात असे कधी कधी होते. एखादी संज्ञा जेव्हा येते तेव्हा तिचा अर्थ वेगळा असतो. पुढे कालांतराने वेगळे संदर्भ त्या संज्ञेभोवती गोळा होतात आणि त्या संज्ञेचा अर्थच बदलून जातो. 'ग्रामीण' या संज्ञेचा अर्थ आज बदललेला आहे. केवळ ग्रामीण वास्तवाचे चित्रण करणे येथे अभिप्रेत नाही तर या 'वास्तवामागचे वास्तव' चित्रित करणे हा आता हेतू झाला आहे. म्हणूनच ग्रामीण चळवळीनंतर येणारे वाङ्मय अनेक अर्थाने वेगळे झालेले आहे, असे दिसेल आणि त्यामुळेच ग्रामीण साहित्याच्या चळवळीला विरोधही होतो आहे असे म्हणता येईल.

ग्रामीण साहित्याची चळवळ उभी करण्यामध्ये ज्यांचा वाटा आहे, त्यात रा.रं.बोराडे आणि आनंद यादव हे प्रमुख आहेत. रा.रं.बोराडे हे त्यांच्या वैजापूर येथील महाविद्यालयात ग्रामीण आत्मकथनांची शिबिरे नियमाने कित्येक वर्षे भरवीत होते. त्यातूनच 'रानखळगी' सारखे भीमराव वाघचौरे यांचे आगळेवेगळे आत्मकथन साकारले आहे. आनंद यादवांनी स्वतंत्र संमेलने भरवून ग्रामीण साहित्याचे वेगळेपण अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला. या चळवळीत प्रारंभी इतरही अनेक लेखक होते. या चळवळीमुळे जीवनाकडे पाहाण्याचा वेगळा दृष्टीकोन प्राप्त झाला, हे यापूर्वीच सांगितले आहे. त्यामुळे तो ग्रामीण जीवनाचे केवळ चित्रण करीत नाही तर त्या जीवनाचा अन्वयार्थही लावू इच्छितो. यादृष्टीने रा.रं.बोराडे यांचे 'चारा पाणी' आणि आनंद यादव यांचे 'उखडलेली झाडे' ही दोन पुस्तके पाहाता येतील.

ग्रामीण साहित्याच्या चळवळीनंतर एक मोठी लेखकांची पिढी आकाराला आलेली दिसते. (ग्रामीण साहित्य चळवळीपासून दूर असलेल्या लेखकांवरही या नव्या जाणिवांचा परिणाम झालेला आहे असे दिसेल. उदा. राजन गवस, विश्वास पाटील इ.) ही पिढी संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेली आहे. तसेच तिचा सामाजिक स्तरही आधीच्या लेखकांपेक्षा वेगळा आहे असे दिसेल. आधीचे ग्रामीण लेखक नाही म्हटले तर उच्चभ्रू वर्गामधील होते. आज लिहिणारे ग्रामीण लेखक वेगवेगळया सामाजिक स्तरांमधून आलेले आहेत असे दिसेल. त्यामुळे ग्रामीण जीवनाचे बहुविध चित्रण होते आहे असे दिसते. भास्कर चंदनशिव, वासुदेव मुलाटे, श्रीराम गुंदेकर, इंद्रजित भालेराव, श्रीकांत देशमुख, सदानंद देशमुख, विठ्ठल वाघ, रवींद्र शोभणे, प्रतिमा इंगोले, बाबाराव मुसळे, शेषराव मोहिते, तानाजी राऊ पाटील, मोहन पाटील, आनंद

पाटील, आनंद विंगकर, कैलास दौंड, अशोक कोळी, असे किती तरी ग्रामीण लेखक-कवी आज लिहित आहेत. या लेखकांचे लेखन एकूण परंपरेचा आणि समाजव्यवस्थेचाही अर्थ शोधू पाहाते आहे. आपल्या वाटयाला आलेल्या दुय्यम स्थानाचा ते शोध घेऊ पाहाते आहे. 'विषवृक्षाच्या मुळया', 'बुढाई', 'बस्तान', 'लिगाड' आणि 'खांदेपालट', 'इजाळं', 'हल्या हल्या दुधू दे', 'नवी वारुळं', 'जांभळढव्ह', 'पीकपाणी', 'बळीवंत' अवकाळी पावसा नंतरची गोष्ट अशी कही कलाकृती पाहिल्या की ग्रामीण जीवनाच्या उपेक्षेची, शेतकऱ्याच्या उपेक्षेची पाळेमुळे नागर संस्कृतीत आणि भांडवलदारी अर्थव्यवस्थेत आहेत, हेच लेखकांना मांडवयाचे आहे असे जाणवून जाते. हा अर्थव्यवस्थेचा हल्या दूध काही देत नाही याचा अनुभव बाबाराव मुसळे मांडताहेत, तर सहकारामुळे उध्दार होण्याऐवजी शोषणच वाढले आहे, याचा अनुभव डॉ. वासुदेव मुलाटे देऊ पाहातात. शहरांचे खेडयावर होणारे आक्रमण मोहन पाटील यांच्या 'बस्तान' मध्ये आणि प्रतिमा इंगोले यांच्या 'बुढाई' मध्ये अर्थपूर्ण होऊन येते. शतकानुशतकांपासून लुटला गेलेला 'बळीवंत श्रीकांत देशमुख काव्यात्म करतात, तर ग्रामीण भावबंध इंद्रजित भालेराव प्रकट करीत आहेत. विशेषतः त्यांचे 'दूर गेलेला गाव' आणि 'कुळंबिणीची कहाणी' हे कवितासंग्रह पाहावेत, म्हणजे ते थेट म.फुले, विठ्ठल रामजी शिंदे यांच्याशी नाते जोडत आहेत. असे दिसेल. धरणग्रस्तांच्या वाटयाला येणारी ससेहोलपट 'झाडाझडती' मधून प्रकट होते. तसेच 'पांगिरा' (विश्वास पाटील), 'तहान' (सदानंद देशखु) यांसारख्या कादंबऱ्यांमधून ग्रामीण भागातील पाण्याचा प्रश्न कसा तीव्र होतो आहे, याचे दिग्दर्शन मोठया परिणामकारक रीतीने होते आहे असे दिसेल. 'असं जगणं तोलाच' (शेषराव मोहिते), 'रुपसावली'(तानाजी राऊ पाटील) अवकाळी पावसा दरम्यानची गोष्टी - आनंद विंगकर, कापुसकाळ - कैलास दौंड या कादंबऱ्याही या कालखंडातील महत्त्वाच्या कादंबऱ्या होत.

१९७५ नंतरच्या लेखकामधील भास्कर चंदनशिव हे एक महत्त्वाचे लेखक आहेत. शेतीचे दहा दिशांनी होणारे शोषण ते एक जीवनदृष्टी घेऊन प्रकट करतात. म्हणूनच त्यांच्या कथांमधून एक ग्रामविद्रोहाची जाणीव दिसते, तसेच ग्रामीण भागातील दलित-दलितेतर तणावांचे चित्रणही दिसते. यादृष्टीने त्यांची 'पाणी' ही कथा अतिशय अर्थवाही झाली आहे.

शेतीच्या होणाऱ्या शोषणाचीही त्यांना नेटकी जाणीव आहे. 'लाल चिखल' सारखी कथा या संदर्भात पाहाता येईल. टोमॅटोचे अधिक पीक झाले आणि ते मातीमोल भावाने विकावे लागते म्हणून भ्रमचित्त झालेला शेतकरी ते या कथेतून रेखाटतात. 'अंगारमाती', 'बिरडं', 'नवी वारुळं' हे त्यांचे कथासंग्रह जीवनाचा एक नवा आणि वेगळाच अर्थ उलगडून दाखवितात. ग्रामीणांच्या वाटयाला येणारे दुःख आणि दारिद्रीं कोणामुळे आणि कां येते आहे, असा एक भेदक प्रश्न सतत त्यांच्या कथालेखनामागे असतो आणि त्यातून ते 'नवा हिशेब' मांडू पाहातात.

असा नवा हिशेब मांडला तर एकूण जीवनाची, अर्थव्यवस्थेची आणि संस्कृतीचीच पुनर्मांडणी करावी लागणार आहे, हेच हे सारे नवे लेखक आपल्या लेखनामधून सांगत आहे आणि सांस्कृतिक पुनर्मांडणी हे आजच्या प्रस्थापित साकिहत्यविश्वापुढील मोठे आव्हान आहे आणि हा सगळयात मोठा प्रश्न ग्रामीण साहित्य चळवळीने प्रस्थापित साहित्य व्यवस्थेपुढे निर्माण केला आहे. म.फुले यांनी न्यायमूर्ती रानडे यांना पत्र लिहून नेमका हाच प्रश्न उपस्थित केला होता. आजचे ग्रामीण लेखकही म.फुले यांच्याशी नाते सांगत हाच प्रश्न अधिकाधिक ठसठशीतपणे उभा करीत आहेत.

**संदर्भ-**

१. मा.ना.काणगे, प्रतिष्ठान, कादंबरी समीक्षा विशेषांक-जानेवारी १९८१, मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, संपा. नागनाथ कोत्तापल्ले.
२. द.ता.भोसले, ग्रामीण साहित्य एक चिंतन.
३. नागनाथ कोत्तापल्ले, साहित्याचा अन्वयार्थ.
४. र.बा.मंचरकर, अनुष्टुभ, ग्रामीण कादंबरी १९६० ते १९८० आणि नंतर, जानेवारी १९९४ व एप्रिल १९९४.
५. अविनाश सप्रे, प्रदक्षिणाः खंड दुसरा, स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरी-प्रवृत्ती आणि प्रवाह.